# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/03/2023 (सोमवार) सकाळ

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ३५ किमी. अंतरावर मौजा कच्छीमेट स्ट्राबेरी फार्म हाउस दिनांक १९/०३/२०२३ चे ००.०१. वा. ते दिनांक १९/०३/२०२३ चे ००:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रणय मनोहर नागरीकर, वय ३३ वर्ष रा. राम मंदिरच्या मागे राममंदिर वार्ड भंडारा ह. मु. भाटीया हाउस न्यु कॉलनी सदर नागपूर यांचा मामेभाऊ नामे– हर्षल वानखेडे याचे वाढविसानिमीत्य स्ट्राबेरी फार्म हाउस कच्छीमेंट शिवारात वाढदिवस साजरा करणेकरीता रात्री ९.३० वा. दरम्यान गेले असता त्याच फार्म हाउस वर दुसरा कार्यक्रम सुरु असता त्या कार्यक्रमामधील **आरोपी नामे– १) ललीत लेवाकर, २) मोंन्टी खान ३) रितीक माने ४) अभिषेक रामटेके, ५) ढोलेश समर्थ व इतर ४ ते ५ इसम २० ते २५ वयोगटातील इसमांनी** साउंड सिस्टिमवर गाणे वाजविल्याने कार्यक्रमामध्ये झगडा भांडण करुन शिवीगाळ करुन चाकु, लोखंडी सळाख व दगडाने मारहाण करुन जखमी करुन फिर्यादीचे मित्राचे चारचाकी वाहनाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३२६, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६, ४२७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. विवेक सोनवणे पोस्टे कुही मो. नं. ८८०५७३०३६२ हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत भिलेवाडा येथे दिनांक १९/०३/२०२३ चे ०३.१५ वा सुमारास फिर्यादी नामे– नितेश रामदास जुवार रा. भिलेवाडा वय २९ वर्ष याने आपल्या मालकीच्या बकऱ्या आपल्या घरी छपरीत एकुण ०६ बकऱ्या बांधलेल्या असतांना त्यापैकी ०२ बकऱ्या फिर्यादीला दिसल्या नाही करिता बकऱ्यांचा गावात शोध घेतला असता मिळुन आल्या नाही. **आरोपी नामे– १) समिश उर्फ बक्शी संजिव मेश्राम, वय २० वर्ष रा. कपिल नगर नागपुर २) दानेश शेख अब्दुल कादीर, वय २१ वर्ष रा. कामगार नगर टेका नाका नागपुर** यांनी २ बकऱ्या किंमती अंदाजे १५,०००/– रुपयाचे रात्री दरम्यान चोरुन घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ/७५९ प्रकाश गेडाम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर